महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==========================================================

जावक क्रमांक – ७६७/६२ दिनांक :- ०२ मे, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# बृहतसूचीवरुन पात्रता निश्चित करुन गाळे वितरणासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ

## २० मे पर्यंत संबंधित अर्जदारांनी अर्ज करण्याचे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर यांचे आवाहन

मुंबई, दि. ०२ मे, २०२५ :- म्हाडा मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बृहतसूचीवरील संक्रमण शिबिरात वास्तव्यास असणाऱ्या मूळ भाडेकरु/रहिवासी अथवा त्यांचे वारसदार यांच्याकडून दि. २० मे, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत बृहतसूचीवरुन पात्रता निश्चित करुन गाळे वितरणासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जदाराची नोंदणी व ऑनलाईन अर्ज भरण्याकरिता masterlist.mhada.gov.in या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर यांनी केले आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील उपकरप्राप्त इमारतीमधील ज्या भाडेकरु/ रहिवासी यांना निष्कासन सूचना (व्हेकेशन नोटीस) देऊन इमारत खाली करण्यात आलेली आहे व त्यांच्या मूळ इमारतीचा अरुंद भूखंड, आरक्षण, रस्ता रुंदीकरण इत्यादी कारणामुळे पुनर्विकास शक्य नाही. तसेच उपकरप्राप्त इमारती पुनर्रचित झालेल्या आहेत, परंतु कमी गाळे बांधले गेले आहेत अशा वंचित मूळ भाडेकरु / रहिवासी यांना यापूर्वी मंडळाद्वारे पुनर्रचित / पुनर्विकसित इमारतीमध्ये कायमस्वरुपी गाळा देण्यात आलेला नाही व त्यांचे वारसदार संक्रमण शिबीरात स्वतः अधिवास धारण करीत आहेत. अशा बृहतसुचीवरील ख-याखु-या मूळ भाडेकरु/रहिवासी अथवा त्यांचे वारसदार यांच्यासाठी सदर ऑनलाइन अर्ज प्रकिया राबविण्यात येत आहे.

### ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपद्धती

**टप्पा १:-** सर्वप्रथम अर्जदार यांनी म्हाडा संकेतस्थळ www.mhada.gov.in.वर citizen corner मध्ये जाऊन Application for Masterlist वर Click करुन नोंदणी (Registration) करावे अथवा masterlist.mhada.gov.in या संकेतस्थळावर जावून Registration करावे.

**टप्पा २ :-** Login करण्यासाठी नोंदणी (Registration) करतांना वापरलेल्या e-mail ID व पासवर्ड (Password) ने Login करावे. सदर e-mail ID व पासवर्ड (Password) जतन करुन ठेवावा.

**टप्पा ३ :-** Login केल्यानंतर अर्ज करण्याच्या सुचना व पध्दती [Guidelines/ User Manual] दिसून येईल. त्यानुसार अर्ज करावा.

नोंदणी (Registration) करते वेळी अर्जदाराचा वैध मोबाईल नंबर आणि ई-मेल पत्ता असणे आवश्यक आहे. अर्जदाराचा रंगीत फोटो (jpeg format),अर्जदाराचे हस्ताक्षर किंवा अंगठ्याचा ठसा आदीचा फोटो (jpeg format), आधार कार्ड (pdf Format), व्हेकेशन नोटीस, जुन्या इमारतीतील गाळयांची भाडेपावती,

विद्युत देयक, संक्रमण शिबीरातील गाळयाचे वितरण आदेश व ताबा पावती (pdf Format), हस्तांतरण करारनामा (Transfer Agreement)(pdf ) इत्यादी कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

यापूर्वी बृहतसूची समितीने पात्र घोषित केलेल्या अर्जदारांनी नव्याने अर्ज दाखल करु नये. तसेच ज्या अर्जदारांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल केला आहे, अशा अर्जदारांनी पुनश्च नव्याने अर्ज दाखल करु नये. तथापि, ज्यांनी यापुर्वी बृहतसुचीकरीता ऑफलाईन पध्दतीने अर्ज केलेला आहे परंतु त्यांचे प्रकरण अद्याप प्रलंबित आहे, अशा व्यक्तींनी नव्याने ऑनलाईन अर्ज दाखल करावा. अर्ज यशस्वीरित्या Submit केल्यानंतर, अर्जदाराने स्वतः प्रमाणित केलेले, अर्जासोबत ऑनलाईन सादर केलेले कागदपत्र ३० दिवसांच्या कालावधीत कक्ष क्र. ३७२, दुसरा मजला, म्हाडा मुख्यालय, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई - ५१ येथे सादर करावेत. सुनावणीच्या वेळेस अर्जदाराने सर्व अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती व त्यासंबंधीत कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक आहे. अर्जदाराची पात्रता व पुनर्रचित / पुनर्विकसित गाळयाचे वितरण याबाबत म्हाडा अधिनियम १९७६ व विनियम १९८१ तसेच शासनाचे व म्हाडाच्या नवीन धोरणातील तरतुदीमधील धोरणानुसार गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, असे मंडळातर्फे कळविण्यात आले आहे.

###

मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. : 767/62 Dt. May 2, 2025

Press Release

# Online Application Process Begins for Allotment of Tenements Based on Eligibility from the Master List

**Mumbai Building Repairs and Reconstruction Board's Chief Officer Mr. Milind Shambharkar Appeals to Eligible applicants to Apply online by 20th May, 2025**

Mumbai, dt. May 2, 2025 :- MHADA's Mumbai Building Repairs and Reconstruction Board, has invited online applications for the allotment of tenements from the original tenants/residents or their legal heirs residing in transit camps, based on eligibility determined from the master list. The deadline for submitting applications is May 20th, 2025, until 11:59 PM, announced Mr. Milind Shambharkar, Chief Officer of the Board. Applicants can register and submit their applications at masterlist.mhada.gov.in.

**Who Can Apply?**

This process is intended for the original tenants/residents or their heirs who were issued vacation notices and had to vacate their premises due to the dilapidation or redevelopment of cess properties under MHADA jurisdiction.

Reside in transit camps as redevelopment of their original buildings is unfeasible due to narrow plots, reservations, or road widening. Have not been permanently allotted any tenements in redeveloped or reconstructed buildings by the board.

**How to Apply Online?**

**Step 1:** Visit MHADA's website at www.mhada.gov.in and navigate to the Citizen Corner section. Click on Application for Masterlist or directly visit masterlist.mhada.gov.in for registration.

**Step 2:** Use the email ID and password created during registration to log in. Keep this information secure for future use.

**Step 3:** Once logged in, read the instructions and guidelines provided before filling out the application form.

Applicants while making the appeal should be ready with the documents including the scanned copies of Applicant's recent passport-size photo (JPEG format), Applicant's signature or thumb impression (JPEG format), Aadhaar Card (PDF format), Vacation notice, old building rent receipt, electricity bill, transit camp tenement allotment and possession receipt (PDF format), Transfer agreement (if applicable) (PDF format).

However, the Board informs that the individuals already declared eligible by the Master List Committee should not submit new applications. While applicants who have already submitted online applications should not reapply. Besides, those who previously applied offline and have pending cases must reapply online.

After successfully submitting the online application, applicants must submit self-attested copies of their application along with supporting documents within 30 days at Room No. 372, 2nd Floor, MHADA Headquarters, Griha Nirman Bhavan, Kalanagar, Bandra East, Mumbai – 400051. During the hearing, applicants must carry original documents along with any other related documents. Eligibility and allotment will be decided as per the MHADA Act, 1976, the Rules of 1981, and the provisions outlined in the latest government policies and MHADA regulations.

For further details, visit masterlist.mhada.gov.in.

###

Chief Public Relations Officer/ MHADA